# व्हर्लपूल ऑफ इंडिया लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय - प्लॉट नं. ए-४, एमआयडीसी, रांजणगाव, ता. शिरुर जि. पुणे - ४१२२२०.
दूरध्वनी क्रमांक : ०१२४-४५९१३००, फॅक्स क्रमांक : ०१२४-४५९१३०१.
ई मेल- investor_contact@whirlpool.com
सीआयएन: एल२९१९१पीएन१९६०पीएलसी०२००६३ वेबसाईट-www.whirlpoolindia.com

# नोटीस

या नोटिसीद्वारे कळविण्यात येत आहे की, कंपनीची ५३वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार, १४ ऑगस्ट २०१४ रोजी सकाळी ११ वाजता प्लॉट क्र. ए-४, एमआयडीसी, रांजणगाव, ता. शिरूर, जि. पुणे-४१२२२० येथे घेतली जाणार आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेची कागदोपत्री नोटीस तसेच ३१ मार्च २०१४ रोजी संपलेल्या वर्षाचा ताळेबंद सदस्यांना (ज्या सदस्यांनी ई-मेल आयडी सादर केलेले नाहीत) त्यांच्या पोस्टाच्या पत्त्यावर पोस्टाने पाठविण्याची प्रक्रिया १४ जुलै २०१४ रोजी पूर्ण करण्यात आलेली आहे. ज्या सदस्यांनी आपले ई-मेल पत्ते कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपेंट(स्)यांच्याकडे नोंदविलेले आहेत, अशा सदस्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस व वार्षिक ताळेबंद सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस( इंडिया) लि.(सीडीएसएल)यांनी १७ जुलै २०१४ रोजी ई-मेलच्या माध्यमातून पाठविण्यात आली आहेत.

सदस्य हे आपले मत इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सीडीएसएलने पुरविलेल्या सेवेच्या माध्यमातून ई-व्होटिंगद्वारा नोंदवू शकतात. ई-व्होटिंग नेमके कसे करावे, याचा तपशील सर्वसाधारण सभेसाठीच्या नोटीसीतील टिपणात टिपण क्र. १३ मध्ये देण्यात आला आहे. ई-व्होटिंगद्वारा मत देण्यापूर्वी सदस्यांनी या सूचनांचा काळजीपूर्वक अभ्यास करावा, अशी विनंती करण्यात येत आहे. ई-व्होटिंगची सुरुवात शुक्रवार ८ ऑगस्ट २०१४ रोजी सकाळी ९.०० वाजता होईल व ई-व्होटिंगचा कालावधी रविवार १० ऑगस्ट २०१४ रोजी सायंकाळी ६.०० वा. संपेल. कृपया हे लक्षात असू द्या की, १० ऑगस्ट २०१४च्या सायंकाळच्या ६.०० वाजल्यानंतर ई-व्होटिंग करू दिले जाणार नाही.

या नोटिसीद्वारे सदस्यांना कळविण्यात येते की, बैठकीची नोटीस आणि वार्षिक ताळेबंद कंपनीच्या वेबसाईटवरून (www.whirlpoolindia.com) डाऊनलोड करता येतील. ई-व्होटिंग संदर्भात कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी ती खाली स्वाक्षरी करणाऱ्यांकडे नोंदवावी.

याद्वारे कंपनी कायदा २०१३ मधील कलम ९१ नुसार अशीही नोटीस देण्यात येत आहे की, कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमुळे सदस्यांची नोंदवही व शेअर हस्तांतरण पुस्तिका ७ ऑगस्ट २०१४ ते १४ ऑगस्ट २०१४ (दोन्ही दिवस धरून) बंद राहील.

ठिकाण : गुडगाव
तारीख : १९ जुलै २०१४

करिता व्हर्लपूल ऑफ इंडिया लि.,
सही/-
रवि सभरवाल, कंपनी सचिव